सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय , नाशिक , (आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

**दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००**

**वाचा :** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग,यांचे कडीलअधिसूचना क्र.करोना २०२० /प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

४. मा. मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन, यांचेकडील महसूल व वन , आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन अधिसूचना क्र.DMU/2020.CR.92/DisM-1, दिनांक २३ मार्च २०२० .

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू /१३६ /२०२०**
**नाशिक दिनांक :-२३ /०३/ २०२०**

## आदेश

ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी कोविड १९ विषाणू च्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून संदर्भीय ४ अन्वये मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन ( Lockdown) ची घोषणा केलेली आहे .

ज्या अर्थी सध्या देशात आणि राज्याचे इतर भागात कोरोना विषाणू संसर्ग झालेले रुग्ण आढळून येत आहेत आणि सदर रुग्णांचे संपर्कात आलेल्या इतर व्यक्तींनाहि या संसर्गाची लागण होण्याचा धोका असतो आणि असे संसर्ग झालेले रुग्ण आणि त्यांचे सहवासात आलेले इतर व्यक्ती या जिल्ह्याच्या भौगोलिक सीमेतून वेगवेगळ्या मार्गाने प्रवेश करण्याची आणि या जिल्ह्यातील इतर नागरिकांचे संपर्कात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे . या पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणूचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीविताला , आरोग्याला किंवा सुरक्षितेलला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे आणि कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून देशाचे आणि राज्यातील इतर जिल्ह्यातून प्रवास करून , नागरिकांना नाशिक जिल्ह्याचे सीमेमध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी राज्य शासनाचे संदर्भीय १ ते ४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **मी सुरज दि. मांढरे, जिल्हाधिकारी, नाशिक , राज्यातील इतर जिल्ह्यातून वेगवेगळ्या साधनांद्वारे प्रवास करून नाशिक जिल्ह्याचे सीमेमध्ये प्रवेश करण्यास मनाई करण्याचे आदेश देत आहे .** सदरचे आदेश दिनांक २४/०३/२०२० चे सकाळी ०८.०० वाजले पासून दिनांक ३१ /०३/२०२० पर्यंत अंमलात राहतील .तथापि आपत्कालीन वैद्यकीय सेवा यांना या आदेशातून सूट देनेत येत आहे .

उपरोक्त आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती ,संस्था आणि संघटना विरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ , साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे प्रचलित इतर अधिनियम व नियम या अन्वये कायदेशीर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

(सुरज दि.मांढरे, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

**प्रती -** १. मा. पोलीस आयुक्त, शहर पोलीस , नाशिक माहितीस्तव सविनय सादर.
२ . पोलीस अधीक्षक, ग्रामीण पोलीस ,नाशिक सावश्यक कार्यवाही साठी .
३. उपविभायीय दंडाधिकारी / तहसीलदार (सर्व )..............................जिल्हा नाशिक, आवश्यक कार्यवाही साठी.
४ . सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये विभाग प्रमुख ............ ............जिल्हा नाशिक , आवश्यक कार्यवाही साठी.

**प्रत-** १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

(सुरज दि.मांढरे, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक